# मुंब्रा वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे हर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २५३ /२०२४ दि. २२/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, मुंब्रा वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४** चे अनुषंगाने **एम.एम.व्हॅली स्टेडीयम येथे** दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी होणार असुन शिमला पार्क येथुन मित्तल रोडने स्ट्रॉंगरुम कडे जाणाऱ्या मार्गावर वरील वाहनांना प्रवेशबंदी करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद वेळ –** १) मित्तल रोड तसेच शिमला पार्क येथुन एम.एम.व्हॅली ( स्ट्रॉंगरुम ) परीसरात जाणाऱ्या वाहनांना **मिल्लत ग्राऊंड व शिमला पार्क 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मुंब्रा मुख्य रोडने मुंब्रा स्टेशन ते वाय जक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) रेतीबंदर कडुन वाय जक्शंनकडे तसेच वाय जक्शंन कडुन रेतीबंदरकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांना मुंब्रा शहरात येण्यास **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मुंब्रा शहरात न येता मुंब्रा बायपास मार्गे वाय जंक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २३/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वा. पासुन ते रात्रौ २२:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे/नवी मुंबई.

मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/नवी मुंबई.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व पो.निरी. वाहतूक उपविभाग ठाणे.

CS CamScanner